# Greenlawns School, Worli

**सहामाही परीक्षा (प्रथम सत्र २५-२६)**

**मराठी**

**इयत्ता:- दहावी** **पूर्णांक:- ८०**

**दिनांक:- २५ .०९.२०२५** **वेळ –२ तास**

**सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.**

**शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.**

---

**प्र. १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-. (१०)**

**१.इंटरनेट : एक वरदान**

**२.आजची जागृत स्त्री**

**३. मी आरसा बोलतोय**

**प्र.२) विद्यार्थी या नात्याने मराठी सुलेखन या वर्गात प्रवेश देण्याची विनंती करणारे पत्र संबंधित व्यक्तीला लिहा. (७)**

**प्र. ३) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

भारत हा विविधतेत एकतेचे अद्वितीय उदाहरण आहे. येथे अनेक धर्म, जाती, भाषा, परंपरा आणि संस्कृती एकत्र नांदतात. हिमालयाच्या उंच शिखरांपासून ते दक्षिणेच्या समुद्रकिनाऱ्यांपर्यंत, पूर्वेच्या जंगलांपासून ते पश्चिमेच्या वाळवंटांपर्यंत प्रत्येक भागाचे स्वरूप वेगळे आहे. तरीसुद्धा "सर्व धर्म समभाव" हीच आपली खरी ओळख आहे.

भारतीय संस्कृतीचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. वेद, उपनिषद, रामायण, महाभारत यांसारख्या ग्रंथांनी मानवाला धर्म, नीती व कर्तव्याची शिकवण दिली आहे. अशोक, अकबर, शिवाजी महाराज यांसारख्या शासकांनी विविधतेत एकतेचा आदर्श घालून दिला. महात्मा गांधींनी अहिंसा आणि सत्य यांची ताकद जगाला दाखवून दिली.

आजच्या युगात विज्ञान व तंत्रज्ञानामुळे प्रगती झपाट्याने होत आहे. अवकाश संशोधन, औद्योगिक वाढ, शेतीतील सुधारणा आणि संगणक क्रांती यामुळे भारत जागतिक पटलावर उभा राहतो आहे. तरीसुद्धा काही अडचणीही आहेत. जातीयवाद, धार्मिक विद्वेष, प्रदूषण, गरिबी आणि बेरोजगारी या समस्या अजूनही देशासमोर आहेत.

या समस्या दूर करण्यासाठी एकजूट, शिक्षणाचा प्रसार, पर्यावरणपूरक विकास आणि सर्वांना समान संधी देणे आवश्यक आहे. तरच भारत खऱ्या अर्थाने "विश्वगुरू" होऊ शकेल. आजच्या तरुण पिढीवर ही

मोठी जबाबदारी आहे. राष्ट्रप्रेम, प्रामाणिकपणा व कठोर परिश्रम यांच्या जोरावर तरुणाई भारताला अधिक प्रगत, सुरक्षित आणि सामर्थ्यवान बनवू शकते.

1. भारताची खरी ओळख कोणती आहे? कोणत्या शासकांनी विविधतेत एकतेचा आदर्श घालून दिला? (२)

2. भारतीय संस्कृतीचे वैभव कोणत्या ग्रंथांमधून दिसते? (२)

3. तरुणाईची जबाबदारी कोणत्या बाबतीत आहे? (२)

4. आज भारत कोणत्या क्षेत्रांत प्रगती करत आहे? (२)

5. भारताला "विश्वगुरू" होण्यासाठी काय करणे आवश्यक आहे? (२)

## <u>व्याकरण - विभाग</u>

प्रश्न ४) अ) समानार्थी शब्द लिहा :- (२)

१. मनीषा -

i) इच्छा ii) शिक्षा iii) इज्जत iv) प्रशंसा

२. निश्चल-

i) अछल ii) अचला iii) अचल iv) अचाल

आ) विरुद्धार्थी शब्द लिहा :-. (२)

१. एकेरी

i) दूहेरी ii) दुहरी iii) दुहारी iv) दुहेरी

२. श्रेष्ठ

i) कनिष्क ii) कनिष्ठ iii) कनीष्ट iv) कनिष्ट

इ) शब्द समूहाबद्दल एक शब्द लिहा :- (२)

i) केलेल्या उपकरांची जाणीव नसणारा

i) कृतज्ञ ii) कृतघ्न iii) क्रतज्ञ iv) शत्रुघ्न

ii) बहुतेकांचे ऐकून घेणारा

i) बहुश्रूत ii) बाहुशुत iii) बाहुश्रूत iv) बहुसुत

**ई) खालील वाक्यातील रेखांकित विकारी शब्दाचा प्रकार लिहा. (२)**

**१) राम अतिशय हुशार <u>व</u> स्वाभिमानी होता.**

**२) मावशीने <u>त्याला</u> शाळेत घातले.**

**उ) खालील वाक्यांचे प्रकार ओळखून लिहा. (३)**

**i) मी गेंड्याचे फोटो काढू का?**

**ii) मुलांनो, रोज देवाची प्रार्थना करा.**

**iii) कशी छान चित्र आहेत रंगीबेरंगी !**

**ऊ) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरून ती वाक्ये पुन्हा लिहा. (२)**

**i) परीकथा बोधकथा विज्ञानकथा ऐतिहासिक कथा हे माझेच अनेक प्रकार आहेत**

**ii) गुरुजी म्हणाले तू उत्तम नागरिक आहेस.**

**<u>साहित्य – विभाग ( अंक – ४० )</u>**

**प्र. ५ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (९)**

**१) लेखक रा.ग. जाधव यांची संवेदनशीलता जाणवणारे कोणतेही एक उदाहरण पाठाच्या आधारे स्पष्ट करा.**

**२) भडसावळे गुरुजींच्या मते सकाळची वेळ अभ्यासाला योग्य का असते?**

**३) तुम्हांला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्यांची गुणवैशिष्ट्ये लिहा.**

**आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (३)**

**१) भिक्षेकऱ्याचे तत्त्वज्ञान एका वाक्यात सांगा.**

**२) कोणत्या विचाराने निरंजन हुरळून गेला होता?**

**३) सन्मानाची प्रतीके लिहा.**

**इ) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- (३)**

१) आता__________रेल्वे आल्याने रेल्वेचा छान पूल नदीवर आला.

२) मी___________ साली मराठी साहित्य सम्मेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो.

३) हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या, __________श्रमिकांना !

ई) एका शब्दात उत्तरे लिहा :- (४)

१) लेखक कोणत्या कोशाचे अध्यक्ष झाले ?

२) भिकाऱ्याच्या अंगावर काय होते?

३) निरंजनची अपार श्रद्धा कोणावर होती?

४) पंचनामा करणारे कोण होते ?

उ) कोण-कोणास म्हणाले ते लिहा (३)

१) "या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे ."

२) "रडत बसू नको. शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर "

३) "तुम्हांला शाली दिली तर चालेल काय ?"

ऊ) शब्दार्थ लिहा :- (३)

१. झपाझप -

२. गौरव -

३. गारवा -

## कविता – विभाग

प्र. ६) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:- (६)

१. 'दोन दिवस' या कवितेतून मिळणारा संदेश लिहा.

२. कवीच्या हातांची वैशिष्ट्ये सांगा . कवी जगाच्या शाळेत काय शिकले?

आ ) एका शब्दांत उत्तरे लिहा :- (२)

१) चंद्राला दिलेली उपमा -

२) झोतभट्टीत शेकणारे -

इ) पुढील कवितेच्या ओळींचे भावार्थ लिहा :- (२)

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे

ई)शब्दार्थ लिहा :-. (५)

१. वाळविले -

२. पेलावे -

३. साहाय्यास -

४. डोईवर -

५. जिंदगी -

-----------×समाप्त ×----------------